R.No. MHHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

R.No. MHHMAR/25/A3029

E-mail : dainikmhavratt@gmail.com

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : २५

दि. ०३ जानेवारी २०२६, वार :शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## राज्यात शालेय शिक्षणात मराठी हीच अनिवार्य भाषा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




सातारा : राज्यात शालेय शिक्षणात मराठी हीच अनिवार्य भाषा राहील. इतर कोणतीही भारतीय भाषा अनिवार्य नसेल, ती ऐच्छिक स्वरूपात राहील. इतर भाषा कोणत्या इयत्तेपासून सुरू करायच्या याबाबतचा निर्णय डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर घेतला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती महाराष्ट्राचा आत्मा आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी सातारा येथील शाहू स्टेडियममध्ये आयोजित ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी केले.

भाषाविषयक धोरण स्पष्ट करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात मराठी भाषेची सक्ती असेल; मात्र इतर कोणत्याही भारतीय भाषेची सक्ती केली जाणार नाही. इतर भाषा ऐच्छिक असतील. यासंदर्भात अभ्यासासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली असून, तिचा अहवाल अंतिम टप्प्यात असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संमेलनाच्या उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. मृदुला गर्ग, स्वागताध्यक्ष तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ९९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्र्वास पाटील, ९८ व्या संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, आमदार अतुल भोसले, मनोज घोरपडे, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, नगराध्यक्ष अमोल मोहिते, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, उद्योजक व संमेलनाचे संरक्षक फरोख कूपर, जिल्हाधिकारी संतोष पाटील तसेच साहित्य महामंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

विश्र्वास पाटील यांची 'पानिपत' कादंबरी वाचताना आपल्या विचारविश्र्वावर खोल परिणाम झाल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मराठी मातीशी प्रामाणिक राहून इतिहास, समाज आणि माणूस केंद्रस्थानी ठेवणारे साहित्य निर्माण होणे हीच मराठी साहित्याची खरी ओळख आहे. वारकरी साहित्य, संत ज्ञानेश्र्वर महाराज, संत नामदेव महाराज यांच्या योगदानाचा गौरव करताना संत तुकाराम महाराजांचे विचार आणि 'शब्देचि रत्ने' ही परंपरा आजही समाजाला दिशा देत असल्याचे त्यांनी नमूद केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यव्यवहार कोश तयार करून मराठी भाषेला प्रशासकीय दर्जा दिला, याची आठवण करून देत मुख्यमंत्री म्हणाले की, मराठीच्या संवर्धनासाठी शासन कटिबद्ध आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला असून, आता मराठीच्या विकासासाठी केंद्र सरकारच्या सहकार्याने सकारात्मक पावले उचलली जात आहेत. मात्र, केवळ दर्जा मिळवणे पुरेसे नसून मराठीला व्यापक लोकमान्यता मिळवून देणे हे आपले ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'जेएनयू'सारख्या संस्थांमध्ये मराठी अध्यासन सुरू करण्यात आल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

मराठी साहित्य क्षेत्रात कोणताही हस्तक्षेप होऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, साहित्य निर्मिती ही समाजाच्या जाणिवा विस्तारण्यासाठी असते. त्यामुळे टीका आणि गौरव या दोन्हींतून सुधारण्याचा मार्ग शोधला पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

साताऱ्याच्या साहित्यिक परंपरेचा गौरव करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आजवर झालेल्या ९८ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांपैकी सर्वाधिक सहा संमेलनांचे आयोजन सातारा जिल्ह्यात झाले असून, सर्वाधिक १७ संमेलनाध्यक्ष हे सातारा जिल्ह्याचे भूमीपुत्र होते.

संमेलनाच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषद, शाहूपुरी शाखा, मावळा फाउंडेशन, सातारा तसेच सहभागी सर्व संस्थांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले. या साहित्य संमेलनाच्या माध्यमातून मराठी साहित्याला नवी ऊर्जा आणि दिशा मिळेल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

संमेलनाच्या उद्घाटक डॉ. मृदुला गर्ग यांनी राष्ट्रीय स्तरावरील मराठी साहित्याचा आढावा घेताना कवी नामदेव ढसाळ, मल्लिका अमर शेख, उर्मिला पवार, शरणकुमार लिंबाळे, विजय तेंडुलकर आणि महेश एलकुंचवार यांच्या साहित्य व नाटकांचा गौरव केला.

९९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्र्वास पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात साताऱ्याचा गौरवशाली इतिहास उद्धृत करून मराठी साहित्याची समृद्ध परंपरा, सातारा जिल्ह्यातील साहित्यिकांचे योगदान आणि आपल्याला लिहते करणाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तुमच्या खांद्यावर झेंडा कोणताही असो त्याचा दांडा मराठीच असायला हवा. तुमच्या खांद्यावर पालखी कोणाचीही असू दे तिचा गोंडा मराठीच असायला हवा, असे सांगतानाच मराठी भाषेच्या समृद्धीसाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

राज्यातील सर्व एसटी बसस्थानके आणि रेल्वेस्थानक येथे वृत्तपत्रविक्रेते आणि पुस्तक विक्रेत्यांना पुन्हा दुकाने द्यावीत. तसेच सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या व तहसीलदारांच्या कार्यालयासमोर माफक दरात पुस्तक विक्रीच्या दुकानांना परवानगी द्यावी, अशा सूचना त्यांनी मांडल्या.

डॉ. तारा भवाळकर यांनी त्यांच्या कार्यकाळातील अनुभव कथन करताना, मराठी भाषा अधिक व्यापक होत असल्याचे सांगितले. गावखेड्यातील मुले मराठीत लेखन करत असून, गावोगावी साहित्य संमेलनांचे आयोजन होत असल्याचे चित्र आश्र्वासक आहे. ग्रामीण भागातही नवीन लेखक, प्रकाशक तयार होत आहेत. त्यांना प्रोत्साहन दिल्यास मराठीचा खऱ्या अर्थाने विकास होईल. प्रत्येकालाच आपल्या भावना अभिव्यक्त होता येत नाहीत. त्या व्यक्त करत मी फक्त समूह मनाचा आवाज झाले, असेही त्या म्हणाल्या.

स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंह भोसले यांनी साहित्य संमेलनामागील भूमिका स्पष्ट करताना, शतकपूर्व साहित्य संमेलन साताऱ्यात होत असल्याचा आनंद व्यक्त केला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होत असलेले हे पहिलेच साहित्य संमेलन असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी मराठी साहित्य चळवळीचा आढावा घेत कर्नाटक सीमाभागातील मराठी भाषिकांच्या पाठीशी साहित्य महामंडळ ठामपणे उभे असल्याचे सांगितले.

संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोदी कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात संमेलनाची सविस्तर माहिती दिली. साहित्य महामंडळाच्या कार्यवाह सुनीताराजे पवार यांनी आभार मानले.

## हक्काचे जे आहे, ते ग्रामीण भागातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम आ. रमेशआप्पा करीत आहेत



लातूर - लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी स्वाभिमानाने जगायला शिकवले, प्रामाणिकपणे जनतेची सेवा करायला सांगितले. लातूर ग्रामीण मतदार संघातील अठरापगड जाती धर्मांनी मतदान रुपी आशीर्वाद देऊन रमेशआप्पा कराड साहेबांना विधानसभेत पाठवले. विकास निधी काय असतो हे त्यांनी दाखवून दिले असून जे तुमच्या हक्काचे आहे ते तुमच्या पर्यंत पोहोचविण्याचे काम करीत आहेत असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर तालुक्यातील मौजे वंजारवाडी येथे आमदार निधीतून २० लक्ष रुपये खर्चाच्या बांधण्यात येणाऱ्या हनुमान मंदिरासमोरील सभागृहाचे भूमिपूजन, ग्रामविकास विभाग अंतर्गत जन सुविधा योजनेतून बांधण्यात आलेल्या ग्रामपंचायत इमारतीचे आणि आमदार निधीतील अंबाबाई मंदिरासमोरील सभागृहाचे लोकार्पण युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते मोठ्या उत्साहाच्या आणि जल्लोषाच्या वातावरणात गुरुवारी करण्यात आले. यावेळी भाजपाचे जिल्हा चिटणीस दशरथ सरवदे, विष्णू गोरे, उमेश सोमानी, प्रताप भुरे, दवणगावचे सरपंच रवींद्र नागरगोजे, कुंभारीचे उपसरपंच भीमराव मुंडे, वंजारवाडीचे सरपंच पाटलोबा मुंडे, माजी सरपंच सूर्यकांत मुंडे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास वंजारवाडी येथील ग्रामस्थ महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे नेतृत्व या रेणापूर भागाने तळहातावरील फोडाप्रमाणे जपले आणि मोठे केले मुंडे साहेबांनी ही रेणापूरचे नाव राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशात केले. त्यांनी या रेणापूर भागाची जबाबदारी भाजपाचे नेते रमेशआप्पा कराड साहेब यांच्यावर दिली असल्याचे सांगून यावेळी बोलताना युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, रमेशआप्पा कराड यांनी कधीच जातीपातीचे राजकारण केले नाही. दोन वेळा अपयश आले म्हणून खचले नाहीत. सर्वांना सोबत घेऊन सातत्याने जनतेची सेवा प्रामाणिकपणे करीत राहिले, सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष केला, कष्ट घेतले म्हणूनच गेल्या विधानसभा निवडणुकीत आठरा पगड जाती धर्मांनी आशीर्वाद देऊन आप्पासाहेबांना विधानसभेत काम करण्याची संधी दिली.

पुढे बोलताना युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, माझ्या मूळ रामेश्र्वर गावाहून अधिक प्रेम वंजारवाडी गावाने आमच्यावर केले आहे. मागील निवडणुकीत जेव्हा लातूरची जागा सेनेला सोडण्यात आली तेव्हा मतदान यंत्रावर कमळ दिसले नाही म्हणून वंजारवाडी गावातील अनेक ज्येष्ठ नागरिकांनी मतदान केलेच नाही याची आठवण करून दिली. वंजारवाडी येथील विविध विकास कामासाठी निधीची कमतरता पडणार नाही पावसाळ्यापूर्वी स्मशानभूमीच्या कंपाउंड वॉलचे काम पूर्ण केले जाईल महिनाभरात वंजारवाडी गावाला महसुली मिळवून देऊ त्याचबरोबर येत्या काळात लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या नावाने या गावात प्रवेशद्वाराची कमान उभी करण्यात येईल असे आश्र्वासन दिले.

प्रारंभी भाजपाचे दशरथ सरवदे, विष्णू गोरे, उमेश सोमानी, बाळासाहेब मुंडे यांनी आपले मनोगत व्यक्त करून लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून गावात आणि परिसरात होत असलेल्या विविध विकास कामाची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपक मुंडे यांनी केले तर शेवटी गोविंद मुंडे यांनी उपस्थित यांचे आभार मानले. याप्रसंगी भाऊराव घुगे, बाळासाहेब मुंडे, गोविंद मुंडे, श्रीमंत घुगे, दासराव मुंडे, रामराव मुंडे, माणिक मुंडे यांच्यासह भाजपाचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते वंजारवाडी येथील महिला, पुरुष, तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर महापालिका निवडणूक: राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) व रिपब्लिकन सेनेची युती जाहीर



लातूर :- लातूर महानगरपालिका निवडणुकीसाठी आनंदराज आंबेडकर यांच्या सूचनेनुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) आणि रिपब्लिकन सेना यांच्यात अधिकृत युती जाहीर झाली. ही घोषणा २ जानेवारी २०२६ रोजी शहरात झालेल्या पत्रकार परिषदेत करण्यात आली.या युतीनुसार, रिपब्लिकन सेना दोन प्रभागांत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या चिन्हावर उमेदवार उभे राहिले. प्रभाग ७-अ: कु. ऐश्र्वर्या सुशील चिकटे (अनुसूचित जाती महिला)प्रभाग २-क: शेख सुलताना शेख मुक्तार (सर्वसाधारण महिला)उर्वरित प्रभागांत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या उमेदवारांना रिपब्लिकन सेनेचा पूर्ण पाठिंबा मिळेल. दोन्ही पक्ष परस्पर संमतीने आवश्यक राजकीय निर्णय घेतील, असे स्पष्ट करण्यात आले. पत्रकार परिषदेला उपस्थित नेते राम दामू कोरडे (रिपब्लिकन सेना, लातूर जिल्हाध्यक्ष)प्रा. युवराज धसवाडीकर (रिपब्लिकन सेना)मकरंद सावे (शहर जिल्हाध्यक्ष)मुर्तुजा खान (राष्ट्रवादी काँग्रेस नेते)विनोद खटके (व्ही.एस. पॅन्थर संघटना संस्थापक अध्यक्ष) सचिन मस्के (उमेदवार) व इतर पदाधिकारी-कार्यकर्तेनेत्यांनी सांगितले, ही युती सामाजिक समतोल आणि विकासाभिमुख राजकारणाला बळकटी देईल. अशी माहिती रिपब्लिकन सेनेचे नेते युवराज धसवाडीकर यांनी दिली.

महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय...

### इतिहासाच्या छातीत कोरलेला प्रतिकार, स्वाभिमानाचा अखंड एल्गार

दरवर्षी १ जानेवारी रोजी महाराष्ट्रातील भीमा कोरेगाव येथे भारताच्या कानाकोपऱ्यातून लाखो आंबेडकर अनुयायी मानवंदना देण्यासाठी एकत्र येतात. ही गर्दी योगायोगाने जमलेली नसते, ना ती कुणाच्या राजकीय आदेशावर उभी असते. ही उपस्थिती म्हणजे शतकानुशतके दबवून ठेवलेल्या समाजाचा स्वाभिमान, ज्याला इतिहास पुसूनही संपवता आले नाही, याची जाहीर घोषणा असते.

भीमा कोरेगाव हे ठिकाण काही जणांना आजही अस्वस्थ करते. कारण ते स्मारक नाही, तर ते प्रश्न आहे. तो प्रश्न आहे – इतिहास कुणाचा? आणि विजय कुणाचा? १८१८ मधील लढाई केवळ सैनिकी संघर्ष नव्हता; तो जातीय अत्याचाराच्या व्यवस्थेविरुद्ध उभा राहिलेल्या दलित सैनिकांच्या शौर्याचा ऐतिहासिक दस्तऐवज होता. म्हणूनच हा विजयस्तंभ काहींना टोचतो, काहींना खुपतो आणि काहींना पुसून टाकावासा वाटतो.

भीमा कोरेगावला होणारी मानवंदना ही भूतकाळाची पूजा नाही, तर वर्तमानाला दिलेला इशारा आहे. ज्यांचा इतिहास जाणीवपूर्वक पुसला गेला, ज्यांना पराभूत म्हणूनच शिकवले गेले, त्यांनी इथे येऊन सांगितले – आम्ही होतो, आहोत आणि राहू. हा मेळावा म्हणजे दडपशाहीविरुद्ध उभ्या ठाकलेल्या स्मृतींचा स्फोट आहे.

या स्मृतींना वैचारिक धार दिली ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी. बाबासाहेबांनी इतिहासाकडे पाहण्याची गुलाम मानसिकता बदलली. त्यांनी शिकवले की इतिहास हा अभिमानासाठी नाही, तर अन्याय ओळखण्यासाठी आणि तो मोडून काढण्यासाठी वापरायचा असतो. म्हणूनच भीमा कोरेगाव हे बाबासाहेबांच्या विचारांचे जिवंत व्यासपीठ बनले.

आज जेव्हा देशात एक इतिहास, एक संस्कृती लादण्याचे प्रयत्न होत आहेत, तेव्हा भीमा कोरेगाव ठामपणे सांगतो – भारत एकसुरी नाही. येथे अनेक इतिहास आहेत, अनेक संघर्ष आहेत आणि अनेक सत्ये आहेत. या सत्यांना पुसण्याचा प्रत्येक प्रयत्न म्हणजे लोकशाहीवर घातलेला घाला आहे.

भीमा कोरेगावबाबत मुद्दाम गैरसमज पसरवले जातात. शांततेत, शिस्तीत आणि संविधानिक मार्गाने जमणाऱ्या लाखो लोकांना संशयाच्या नजरेने पाहिले जाते. प्रश्न असा आहे – जेव्हा हिंसक जमावांना मोकळीक दिली जाते, तेव्हा भीमा कोरेगावची शांत मानवंदना धोकादायक कशी ठरते? कारण ही मानवंदना सत्तेला प्रश्न विचारते, आणि प्रश्न विचारणारी जनता हीच सत्तेला सर्वाधिक अस्वस्थ करते.

ही मानवंदना कोणत्याही समाजाविरुद्ध नाही, पण ती अन्यायाच्या बाजूनेही नाही. ती स्पष्टपणे सांगते की जातीय वर्चस्वाच्या इतिहासाला गौरव म्हणून मिरवू देणार नाही. म्हणूनच भीमा कोरेगाव हे काहींसाठी वादग्रस्त ठरवले जाते. प्रत्यक्षात ते वादग्रस्त नाही, ते अस्वस्थ करणारे सत्य आहे.

लाखो युवक–युवती, महिला, वृद्ध, विद्यार्थी येथे येतात. कुणी घोषणा देत नाही, कुणी दगडफेक करत नाही, कुणी द्वेष पसरवत नाही. ते फक्त नमन करतात – त्या इतिहासाला, ज्याने त्यांना माणूस म्हणून उभे राहण्याची प्रेरणा दिली. ही शांतता अनेकदा हिंसेपेक्षा जास्त प्रखर असते.

भीमा कोरेगाव हे स्मरण करून देते की सामाजिक न्याय हा दयेने मिळत नाही, तो संघर्षातून मिळतो. आणि संघर्षाची स्मृती जिवंत ठेवणे हा गुन्हा नाही, तर तो लोकशाहीचा कणा आहे. जो समाज आपला इतिहास विसरतो, तो पुन्हा गुलाम होतो – भीमा कोरेगाव हेच शिकवतो.

म्हणूनच भारताच्या कानाकोपऱ्यातून येणारे आंबेडकर अनुयायी इथे येतात. ते कोणाला आव्हान देण्यासाठी नाही, तर स्वतःला आठवण करून देण्यासाठी येतात – आपला स्वाभिमान कुणाच्या दयेवर नाही.

भीमा कोरेगाव म्हणजे एक इशारा आहे.
तो सांगतो – इतिहास पुसता येत नाही,
विचार दाबता येत नाही,
आणि स्वाभिमानाच्या यात्रेला कधीही अडवता येत नाही.

### पुणे सैनिक कल्याण विभागात लिपीक टंकलेखक (गट-क) पदाची भरती

लातूर : सैनिक कल्याण विभागातील लिपीक टंकलेखक (गट-क) सरळसेवा पदभरती जाहिरात ४ नोव्हेंबर, २०२५ व शुध्दीपत्रक १२ डिसेंबर, २०२५ विभागाच्या संकेतस्थळावर रोजी प्रसिध्द झाली आहे. अर्जदारांना ऑनलाईन अर्ज भरतीसाठी वेबलिंक देण्यात आली आहे. परंतु, सैनिक कल्याण विभागाचे संकेतस्थळ तांत्रिक कारणाने २६ डिसेंबर, २०२५ पासून निष्क्रिय झाल्याने इच्छुक उमेदवार वेबलिंकपर्यंत पोहचू शकत नाहीत. त्यामुळे ऑनलाईन अर्ज भरण्यास ९ जानेवारी, २०२६ संध्याकाळी २३.५९ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तरी उमेदवारांनी अर्ज भरण्यासाठी https://cdn3.digialm.com/EForms/configuredHtml/32786/96173/Index.html या वेबलिंकचा वापर करुन ऑनलाईन अर्ज भरावेत, असे लातूर येथील जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी कळविले आहे.

# बलात्कारी कुलदीप सेंगरला तुरुंगात नाही,तर फासावर लटकवायला हवे.

उन्नाव बलात्कार प्रकरणी सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती दिल्यानंतर पीडित महिला व त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले.कारण सेंगरच्या जामिन अर्जावर स्थगिती आल्याने सध्याच्या परिस्थितीत त्यांच्या पळवाटांवर अंकुश लागला आहे.परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की राजकीय पुढाऱ्यांच्या अशा घृणास्पद केसचा निकाल कासवाच्या गतीने का चालतो किंवा का लांबविल्या जातो हा मोठा गंभीर आणि गहन प्रश्न आहे.कारण सर्वसामान्यांच्या केसमध्ये सरकार व कायदा तडकाफडकी निर्णय घेतो आणि निर्णय लावतो ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.परंतु आपण ज्याला लोकप्रतिनिधी, आमदार म्हणतो असे माजी आमदार कुलदीप सेंगर यांच्या बलात्कार केस प्रकरणाला तब्बल आठ वर्षे पुर्ण झालीत म्हणजे तब्बल २९२० दिवस तरीही पीडितेला अजुन पर्यंत योग्य न्याय मिळालेला नाही ही दुर्भाग्यपुर्ण बाब आहे.उन्नाव बलात्कार प्रकरण जर फास्ट ट्रॅक कोर्टाच्या माध्यमातून चालविले असते तर आतापर्यंत सेंगर फासावर लटकला असता.सर्वांनाच कल्पना आहे की सेंगर दोषी आहे. परंतु सरकारने जर जातीने पुढाकार घेतला असता तर सेंगरला केंव्हाच फाशी झाली असती हेही तितकेच सत्य आहे..परंतु सरकार सुध्दा सेंगरला वाचविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.सरकारने हेही लक्षात ठेवले पाहिजे की,एका बलात्कारी सेंगरला जर ताबडतोब फाशी झाली तर देशातील राजकीय वर्तुळात भुकंप येईल व बलात्कार प्रकरणावर अंकुश लागेल हेही तितकेच सत्य आहे. राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की काही लोक सत्तेच्या पडद्याआड अनेक घृणास्पद कृत्य करीत असतात. तेच काम कुलदीप सेंगरने सत्तेमध्ये असतांना २०१७ मध्ये केले.परंतु आताही उन्नाव बलात्कार प्रकरणातील आरोपी यांच्यावर अजून पर्यंत कठोर शिक्षा ठोठावण्यात आलेली नाही हे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. देशाती कोणतेही बलात्कार प्रकरण असो अशा केसेसचा निकाल फास्ट ट्रॅक कोर्टाच्या माध्यमातून चालायला पाहिजे व यात ताबडतोब फाशीच्या शिक्षेचे प्रावधान असणे गरजेचे आहे.कारण कुलदीप सेंगर सारखे असे हजारो राजकीय पुढारी आहेत की आपल्या सत्तेचा,संपत्तीचा आणि अधिकाराचा गैरवापर करून घृणास्पद कृत्य करीत असतात. २०१७ च्या उन्नाव बलात्कार प्रकरणात मोठा निर्णय घेतांना सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली हायकोर्टाच्या त्या आदेशाला स्थगिती दिली, ज्यामध्ये अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणी दोषी आणि भाजपमधून हकालपट्टी करण्यात आलेले कुलदीप सेंगर यांची जन्मठेपेची शिक्षा स्थगित करण्यात आली होती.अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणारा नराधम कुलदीप सेंगर याच्या केसचा ताबडतोब निर्णय लावून फाशीच्या शिक्षेचीच मागणी मुख्यत्वे करून सरकारकडून व इतर संपूर्ण राजकीय स्तरातून व्हायला पाहिजे.आता सरकारने वेळ न घालवता उन्नाव बलात्कार प्रकरणातील ठोस पुरावे पहाता पीडीतेला न्याय देण्याच्या उद्देशाने सामोर येण्याची गरज आहे जेणेकरून नराधम बलात्कारी कुलदीप सेंगर याला लवकरात लवकर फाशीची सजा होईल.कारण कुलदीप सेंगरच्या या घृणास्पद कृत्य पहाता सर्वच स्तरातून फाशीच्या शिक्षेची मागणी होत आहे. त्यामुळे सन्माननीय सर्वोच्च न्यायालय यांना माझी नम्र विनंती आहे की उन्नाव बलात्कार प्रकरणाचा निकाल लवकरात लवकर लावून नराधम सेंगरला फासावर लटकविला पाहिजे. तेव्हाच पीडीतेला योग्य न्याय मिळेल व लोकशाहीला नवी दिशा मिळेल.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# सावित्रीबाई फुले : स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रवर्तक



भारतीय समाजाच्या इतिहासात सावित्रीबाई फुले यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे व प्रेरणादायी आहे. स्त्री शिक्षण, सामाजिक समता आणि मानवतावादी मूल्ये यासाठी आयुष्य वेचणाऱ्या सावित्रीबाई फुले या केवळ शिक्षिका नव्हत्या, तर त्या एक थोर समाजसुधारक, कवयित्री आणि परिवर्तनाच्या सर्वकालीन प्रतिक आहेत. ज्या काळात स्त्रीने शिकणे पाप मानले जात होते, त्या काळात त्यांनी शिक्षणाचा दीप प्रज्वलित करुन सामाजिक अज्ञानाच्या अंधाराला आव्हान दिले. स्वतःच्या आयुष्याला आकार देतानाच भारतीय स्त्री-शिक्षणाच्या पायाही त्यांनी घातला.

सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे झाला. त्यांचे वडील खंडोजी नेवसे पाटील हे शेतकरी होते. बालवयातच त्यांचा विवाह महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांच्याशी झाला. ज्योतिराव यांच्या परिवर्तनवादी झंझावाताला गती देणाऱ्या आदर्श पत्नी म्हणून त्या इतिहासात अमर झाल्या. त्या काळातील रूढीप्रमाणे सावित्रीबाई अशिक्षित होत्या; मात्र, ज्योतिराव फुले यांच्या प्रोत्साहनामुळे त्यांनी शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. पतीच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी प्रथम घरीच शिक्षण घेतले आणि पुढे पुण्यात शिक्षक प्रशिक्षण पूर्ण केले. संस्कृती, शालिनता, शिस्त व आधुनिकता याचा मिलाप म्हणजे सावित्रीबाई फुले.

१८४८ साली पुण्यात भिडे वाड्यात भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू करून सावित्रीबाई फुले यांनी इतिहास घडवला. त्या भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या. तो काळ स्त्री शिक्षणाच्या विरोधाचा होता. सावित्रीबाईंना शाळेत जाताना रस्त्यावर लोक शिवीगाळ करीत, दगड-शेण फेकत; तरीही त्यांनी हार मानली नाही. त्या शाळेत जाताना नेहमी एक अतिरिक्त साडी बरोबर ठेवत, अपमान सहन करूनही त्या शिक्षणाच्या कार्यात अविरत कार्यरत राहिल्या. त्या शिक्षण घेणाऱ्या, शिक्षण देणाऱ्या आणि शिक्षण प्रसार-प्रचार करणाऱ्या पहिल्या महिला आहेत.

स्त्री शिक्षणासोबतच सावित्रीबाई फुले यांनी दलित, शूद्र-अतिशूद्र अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी अनेक शाळा सुरू केल्या. त्यांनी स्त्रियांसाठी, मागासवर्गीयांसाठी आणि दुर्लक्षित घटकांसाठी शिक्षणाची दारे उघडली. समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, स्त्री-पुरुष विषमता यांना त्यांनी निर्भीडपणे विरोध केला. विधवाविवाह, पुनर्विवाह, बालहत्या प्रतिबंध, अनाथ बालकांचे संगोपन अशा अनेक सामाजिक प्रश्नांवर त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून मार्ग दाखवला. जातीभेद, धर्मभेद, वर्णभेद साऱ्याच भेदांचा चक्रव्यूह फोडून त्यांनी दीडशे वर्षापूर्वी सर्व धर्म,जात,पंथातील मुलींच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा केला.

सावित्रीबाई फुले या एक संवेदनशील कवयित्रीही होत्या. त्यांच्या कविता समाजप्रबोधन करणाऱ्या होत्या. 'काव्यफुले' आणि 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' व अन्य त्यांचे ग्रंथ सामाजिक परिवर्तनाचा संदेश देतात. त्यांच्या लेखनातून शिक्षणाचे महत्त्व, आत्मसन्मान, स्त्री स्वातंत्र्य आणि मानवतावाद यांचा आग्रह दिसून येतो.

सावित्रीबाई फुले यांनी तत्कालिन समाजव्यवस्थेच्या काही अंध रुढी परंपरा पाळल्या नाहीत. त्यासाठी समाजाच्या रोषाला त्या बळी पडल्या. मात्र, आजपासून दीडशे वर्षांपूर्वीचा त्यांचा संघर्ष महिलांसाठी आजही प्रेरणादायी आहेत. त्यांना अपत्य नव्हते. त्याकाळात अपत्य नसणारी माताही समाजाला सहन व्हायची नाही. मात्र, समाजाच्या नावे ठेवण्याची, टोमण्याची पर्वा न करता जैविक मूल नसताना त्यांनी एका विधवेच्या मुलाला दत्तक घेतले. त्याचे संगोपन केले. त्याला पुढे डॉक्टर केले. हा मुलगा देखील त्यांच्यापर्यंत एका क्रांतिकारी निर्णयातून पोहचला. ज्योतिराव आणि सावित्रीबाई यांनी त्या काळात बालहत्या प्रतिबंधक गृह केंद्र सुरु केले. शोषित विधवा, असाह्य, कुमारी मातांना समाजात मरण यातना भोगाव्या लागणारा तो काळ. त्याकाळात या दाम्पत्यांनी हे बालहत्या प्रतिबंधक गृह सुरु केले. या आश्रय गृहातील विधवेला झालेला 'यशवंत' हा मुलगा त्यांनी पुढे दत्तक घेतला. त्यामुळे स्वतः निपुत्रिक असणे हे कोणतेही पाप नाही. विधवांना संरक्षण देणे समाजविरोधी नाही. मुलगा दत्तक घेणे ही एक आदर्श उपाययोजना आहे, असा वस्तूपाठ घालण्याचा निर्णय दीडशे वर्षापूर्वी घेतलेल्या सावित्रीबाई आजही आमच्या समाजाला प्रेरणादायी आहेत.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्यात सावित्रीबाई फुले यांचा सक्रिय सहभाग होता. समाजातील अन्यायग्रस्त घटकांना न्याय मिळावा, समतेवर आधारित समाजनिर्मिती व्हावी, यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. ज्योतिराव फुले यांच्या निधनानंतरही त्यांनी सत्यशोधक समाजाचे कार्य पुढे चालू ठेवले.

१८९६-९७ साली पुण्यात प्लेगची भीषण साथ पसरली. त्या काळात समाजातील अनेक लोक आजारी लोकांपासून दूर पळत असताना सावित्रीबाई फुले यांनी मात्र प्लेगग्रस्त रुग्णांची सेवा करण्याचा कणखर निर्णय घेतला. त्यांनी स्वतः रुग्णांना खांद्यावर घेऊन रुग्णालयात दाखल केले. याच सेवाकार्यादरम्यान त्यांना प्लेगची लागण झाली आणि १० मार्च १८९७ रोजी पुण्यात त्यांचे निधन झाले. मानवतेच्या सेवेतील हे त्यांचे शेवटचे पण अत्युच्च बलिदान ठरले.

सावित्रीबाई फुले यांचे जीवन हे संघर्ष, करुणा, धैर्य आणि परिवर्तनाचे प्रतीक आहे. त्यांनी स्त्रीला शिक्षणाचा अधिकार मिळवून दिला, समाजाला विचार करायला शिकवले आणि समानतेचा मार्ग दाखवला.

सावित्रीबाई फुले यांचे विचार आणि कार्य आजही तितकेच समर्पक आणि प्रेरणादायी आहेत. शिक्षण, समानता आणि मानवता या मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीसाठी त्यांचे जीवन प्रत्येक पिढीसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ ठरते.

सावित्रीबाई फुले जीवनपट

पूर्ण नाव : सावित्रीबाई ज्योतिराव फुले

जन्मतारीख : ३ जानेवारी १८३१

जन्मगाव : नायगाव, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा, महाराष्ट्र

वडिलांचे नाव : खंडोजी नेवसे पाटील

पतीचे नाव : महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले

कार्य/योगदान : भारतातील पहिल्या महिला शिक्षिका.

पुणे येथे पहिली मुलींची शाळा (१८४८) सुरू केली.

स्त्री शिक्षण, दलित शिक्षण व शूद्र-अतिशूद्र समाजाच्या उन्नतीसाठी कार्य.

बालहत्या प्रतिबंध, विधवाविवाह, स्त्री-पुरुष समानता यांसाठी समाजसुधारणा.

सत्यशोधक समाजाच्या कार्यात सक्रिय सहभाग

प्लेग साथीच्या काळात रुग्णसेवा.

मृत्यू :
१० मार्च १८९७
पुणे, महाराष्ट्र
(प्लेगग्रस्त रुग्णांची सेवा करताना संसर्गामुळे निधन)

ओळख :
भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका
थोर समाजसुधारिका, कवयित्री व शिक्षणतज्ज्ञ

महाराष्ट्र शासन व भारत सरकारकडून गौरविलेले व्यक्तिमत्त्व

**प्रवीण टाके,**
**उपसंचालक,**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोल्हापूर (मो.नं -९७०२८५८७७७)**

# भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी डॉ. रमेश ओव्हाळ यांचा पदोन्नतीनिमित्त सत्कार

लातूर : – भारतीय बौद्ध महासभा जिल्हा लातूर(प) अंतर्गत चालणाऱ्या धम्मदीक्षा समितीचे सचिव डॉ. रमेश ओव्हाळ यांची सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय पदी पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



डॉ. ओव्हाळ यांनी आपल्या कार्यकाळात पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय क्षेत्रात शेतकरी व पशुपालकांसाठी उपयुक्त योजना प्रभावीपणे राबवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. प्रशासकीय कार्यात पारदर्शकता, शिस्तबद्ध नियोजन आणि लोकाभिमुख दृष्टिकोन यामुळे त्यांची ही पदोन्नती प्रेरणादायी असल्याचे धम्म दीक्षा समितीचे प्रमुख राहुल गायकवाड यांनी व्यक्त केले.

सत्कारप्रसंगी बोलताना डॉ. रमेश ओव्हाळ यांनी, ही पदोन्नती म्हणजे केवळ सन्मान नसून अधिक जबाबदारी आहे. शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी मी अधिक तत्परतेने काम करेन, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमास लंडन उच्च विद्या विभूषित तसेच लातूर महानगर पालिकेच्या वॉर्ड क्रमांक ७ च्या रिपब्लिकन सेनेच्या उमेदवार ऐश्र्वर्या सुशीलकुमार चिकटे तसेच भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्षा आशाताई चिकटे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे, धम्मदीक्षा समितीचे उपाध्यक्ष सदानंद कापूरे सर, तालुका सचिव सरिता बनसोडे, रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ कोरडे, संघटक सिद्धांत चिकटे, उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ. ओव्हाळ यांच्या पुढील वाटचालीस यशस्वी भवितव्याच्या शुभेच्छा दिल्या.

# शौर्य दिनानिमित्त वाहतूक मार्गवर पोलिसाकडून जाणूनबुजून कोंडी.

पुणे-नगर महामार्ग: या मार्गावर शौर्य दिनानिमित्त वाहतूक निर्बंध (ठर्शीीळलींळेपी) आणि वळणे (ऊळींशीीळेपी) असतात.जड वाहनांसाठी: मुंबई/पुणेकडून नगरकडे जाणाऱ्या जड वाहनांना शिरूर,न्हावरा, चौफुला, यवत मार्गे जावे लागते,तर नगरकडून पुण्याकडे येणाऱ्या वाहनांनाही याच मार्गावरून वळवले जाते असे सांगितल्या जाते.हलक्या वाहनांसाठी: मुंबईकडून येणाऱ्या हलक्या वाहनांसाठी चाकण-खेड-पाबळ-शिरूर किंवा चाकण-महालुंगे-विश्रामवाडी असे पर्यायी मार्ग असतात.पर्यायी मार्ग: नाशिक फाटा-खडकी-येरवडा-लोणीकंद हा मार्गही काहीवेळा वापरला जातो.शौर्य दिनाच्या काळात,पुणे पोलीस आणि वाहतूक पोलीस मार्गांवर नियंत्रण ठेवतात आणि पार्किंगची सोय करतात.या दिवशी झचझचङ (पुणे महानगर परिवहन महामंडळ) मोफत बस सेवा देखील पुरवते.ही सर्व कागदावर असते. प्रत्येकक्ष यांची अंमलबजावणी होताना दिसत नाही. भीमा कोरेगाव रोड हा पुणे-नगर महामार्गाचा एक भाग असून, १ जानेवारी रोजीच्या शौर्य दिनामुळे तो वाहतुकीसाठी खूप चर्चेत असतो आणि त्यानुसार पर्यायी मार्गांची माहिती महत्त्वाची ठरते.ती नसल्यामुळे निळे,पंचशील झेंडे दिसली की ब्रेरीकिट लावले जातात आणि रास्ता बंद आहे पुढे जाऊन उजवीकडे ,डावीकडे जा सांगितले जाते. वीस मिनिटात भीमा कोरेगाव विजय स्तंभा ला जाण्यासाठी दोन अडीच तास वेळ जातो. पार्किंग ची व्यवस्था सात ते आठ किलोमीटर वर केली जाते. आणि चार किलोमीटर वर आहे असे सांगितले जाते. ही जाणूनबुजून भीमा कोरेगाव विजय स्तंभावर येणाऱ्या भीम सैनिकाची अडवणूक असल्याचे दिसून येते. प्रथम आम्ही भांडुप धम्म उपासिका संघाच्या वतीने आम्ही पोलिस प्रशासनाचा निषेध करतो.असे सुनीता उदेभान तायडे,ज्योति दिलीप थाटे,कोकिळा महादेव बांगर, चंद्रकला सागर तायडे,सुषमा संजय वाकोडे यांनी सांगितले.१ जानेवारी सकाळी चार वाजता पुण्याच्या पुढे होते २० किलोमीटर वर भीमा कोरेगांव होते. पोलिसांनी रोड बंद केला.तीन तास फिरावे लागले. पोलिसांशी या महिलांनी प्रचंड वाद केला.पोलिसांचे मानणे वरुन आदेश आला.लोक सकाळी सकाळी विजय स्तंभा अभिवादन करून निघून जातात.पण पोलिसांच्या मनुवादी मानसिकतेमुळे शौर्य दिनानिमित्त वाहतूक मार्गवर पोलिसाकडून जाणूनबुजून कोंडी करून लाखों अनुयायांना नाहक त्रास दिला जातो.ही स्पष्ट दिसून येत आहे.याचा अनेकांनी आपसात चर्चा करून निषेध केला.पण यावर ठोस निर्णय घेण्यासाठी महिला मंडळ लवकरच बैठकीचे नियोजन करणार आहे.




# मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध

लातूर/ प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आज शुक्रवारी (दि. २ जानेवारी ) बुथनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली.

मनपा निवडणुकीसाठी दि. १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे प्रभाग निहाय विभाजन करून प्रारूप मतदार यादी तयार करण्यात आली होती. दि.२० नोव्हेंबर २०२५ रोजी ती प्रसिद्ध करण्यात आली व त्यावर हरकती व सूचना नंतर अंतिम मतदार यादी दि.१५ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता प्रसिद्ध करण्यात आली.

आयोगाच्या निर्देशानुसार मतदान केंद्र निहाय मतदार यादी शुक्रवारी (दि. २ जानेवारी ) मनपाच्या ालश्रर्ररीीी.ीस या वेबसाईटवर विना फोटोची ही यादी प्रसिद्ध करण्यात आली असून सर्वांसाठी उपलब्ध आहे.तसेच राज्य निवडणुक आयोगाच्या मताधिकार ॲपवर व ारहरीशर्लींशीश्रळीीं.ळप या वेबसाईटवर ाशिरीलह पराश ळप ीींशी श्रळीीं यावर सुध्दा आपले नाव पाहता येईल. त्याच प्रमाणे मनपा मुख्य कार्यालय येथे पहिल्या मजल्यावर कक्ष क्र. ४० येथे प्रकाश खेकडे यांच्या कडे प्रति पेज २ रुपये दराने फोटो असलेली मतदार यादी उपलब्ध करुन घेता येईल

तरी याद्वारे शहरातील मतदार व उमेदवार यांनी आपले नाव कोणत्या मतदान केंद्रावर आहे हे पाहावे व मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे असे आवाहन उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांनी केले आहे.

# आदर्श जीवनशैली, पौषक आहार, औषधी हीच क्षयरोग मुक्तीची त्रिसुत्री - आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड

लातूर, : सध्या भारतात प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत केंद्र सरकरने क्षयरोगमुक्त भारत करण्यासाठी क्षयरोगाचे उच्चाटनाचे नियोजन केलेले आहे. या अनुषंगाने १ जानेवारी, २०२६ रोजी नवीन वर्षाच्या सुरुवातीस लातूर परिमंडळाच्या उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांनी निक्षयमित्र बनून ५५ क्षयरुग्णांना दत्तक घेवून त्यांच्या पोषणाची जबाबदारी घेतली.

तसेच आहार किट देण्यासाठी परिमंडळातील सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, सर्व विभाग प्रमुख यांनी स्वतः निक्षय मित्र बनून प्रत्येकी २० ते ५० पोषण आहार किटचे वितरण करावे. जेणेकरून एकही रुग्ण पोषक आहारासाठी वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच पोषण आहार किटमधील घटकाचे आरोग्यासाठी उपयोग, हे सागून आदर्श जीवनशैलीचे कशी असावी, प्रथिनयुक्त पोषण आहार, पुर्ण औषणी कोर्स व व्यसनांपासून मुक्त राहणे या माध्यमातून क्षयरोगमुक्ती मिळवता येते, असे आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांनी सांगितले.

उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांचा जिल्हा क्षयरोग केंद्राच्यावतीने सेंट्रल क्षेयरोग विभागाकडून प्राप्त प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला. सद्यस्थितीत जिल्ह्यात एकूण १ हजार ९५३ क्षयरुग्ण उपचार घेत असून त्यापैकी ४७० रुग्णांना पोषण आहार किट पुरविले आहेत. अद्याप १ हजार ४८४ क्षयरुग्ण प्रतिक्षेत आहेत. अधिकारी, कर्मचारी तसेच खाजगी संस्था, लोकप्रतिनिधी, उद्योजक व औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधी, सीएसआरच्या माध्यमातून जास्तीत जास्त निक्षय मित्र बनवून पोषण आहार आहार किट देण्याचे आवाहन जिल्हा क्षयरोग अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास पुणे येथील सेवानिवृत्त आरोग्य उपसंचालक डॉ. गायकवाड, लातूर येथील सहाय्यक संचालक डॉ. संजय ढगे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरुरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस. एन. तांबारे, एडीएचएस कुष्ठरोग विभागाचे डॉ. ताबांळे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. सावंत, जिल्हा क्षयरोग केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षवर्धन राऊत, औसाचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. देवणीकर, रेणापूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रेड्डी, तसेच उपसंचालक आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# एमआयडीसीतील बांधकाम अट शिथील करण्याची व्यापारी संघाची मागणी

लातूर : राज्यभर सर्वच एमआडीसीमध्ये एक एकर किंवा त्यापेक्षा कमी जागा असलेल्या भूखंड धारकांना ४० टक्के बांधकामाची अट टाकण्यात आली असून ही अट जाचक असल्याचे मराठवाडा व्यापारी महासंघाचे सल्लागार ॲड. संतोष गिल्डा यांनी उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून याचा राज्यातील सर्वच छोट्या व्यावसाईकांना लाभ होणार आहे. सरकारने लोकल फॉर व्होकल ही योजना अस्तित्वात आणल्यानंतर व स्वदेशी व्यावसायीकांना प्राधान्य दिल्यानंतर एमआयडीसीतील छोट्या व्यापार्यांना ज्यांच्याकडे एक एकरपेक्षा कमी भूखंड आहे अशांना ४० टक्के बांधकाम बंधनकारक केले आहे. छोटे व्यापारी असल्यामुळे कमी भांडवलात व्यवसाय सुरू करताना एवढ्या मोठ्या प्रमाणावर बांधकाम करणे व्यापार्यांना अडचणीचे होत असल्याचे मराठवाडा व्यापारी महासंघाचे सल्लागार संतोष गिल्डा यांनी लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने राज्यातील छोट्या व्यावसायीकांना त्याचा लाभ होणार आहे.

राज्याचे उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक हे लातूर येथे एका खाजगी कार्यक्रमासाठी आले होते. यावेळी त्यांना लातूरसह राज्यातील व्यवसायीकांच्या अडी-अडचणीबाबतची चर्चा मराठवाडा व्यापारी महासंघाचे सल्लागार ॲड. संतोष गिल्डा यांच्यासह अन्य व्यावसायीकांसोबत झाली. यावेळी छोट्या व्यावसायीकांना येत असलेल्या अडचणींबाबत व व्यवसाय वाढी संदर्भात सकारात्मक चर्चा झाल्यानंतर तसेच केंद्र व राज्याचे धोरण स्वदेशी व्यावसायीकांना प्रोत्साहन देणारे असल्याने छोटे-मोठे व्यावसायीक आपआपल्या एमआयडीसीमध्ये नवनवीन प्रयोग तयार करत आहेत. त्यातून रोजगार उपलब्ध होत असल्याने बेरोजगारी दूर होण्यास मदत होते आहे. व्यवसायाला लागणारे भांडवल व मशनरीचा खर्च हे कर्ज रूपाने घेतल्यानंतर व्यावसायीक हा आर्थिक अडचणीतून आपला व्यवसाय करत असताना त्याला एमआयडीसीत ४० टक्के बांधकाम करण्याची अट टाकल्याने व्यवसायातील भांडवल कमी होते शिवाय अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही गोष्ट मराठवाडा व्यापारी संघाच सल्लागार ॲड. संतोष गिल्डा यांनी उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनीही या संदर्भात आपण योग्य तो पर्याय उपलब्ध करून असे आश्वासन दिल्याने लातूरसह महाराष्ट्रातील एमआयडीसीतील छोट्या व्यावसायीकांना याचा फायदा होणार आहे.

# शेतरस्त्यांची उपलब्धता ही ग्रामीण अर्थकारणाला चालना देणारी - राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल

नागपूर: राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दूरदृष्टीतून ग्रामीण भागाला विशेषतः शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीला सहाय्यभूत ठरणारी मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना साकारण्यात आली आहे. या योजनेतून शेतकऱ्यांना आपला शेतमाल बाजारपेठेत वेळेत पोहोचविता येईल. बारमाही शेतरस्त्यांची उपलब्धता ही ग्रामीण अर्थकारणाला चालना देणारी असून ही योजना राज्याच्या प्रत्येक ग्रामीण भागात प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता असून स्थानिक अधिकाऱ्यांनी दक्षता घेण्याच्या सूचना वित्त व नियोजन राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल यांनी केल्या.




सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजने'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी जिल्हाधिकारी, डॉ. विपिन इटनकर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्यासह राज्यभरातील संबंधित नोडल अधिकारी उपस्थित होते. पाणंद रस्ता हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. अनेक वर्षांपासून शेतकरी पाणंद रस्त्यांच्या चिंतेत असतात. त्यांच्यासाठी रस्त्यांची सुविधा केवळ वाहतूकीपुरती मर्यादित नसून शेतमाल जर वेळेवर बाजारपेठेत पोहोचला तर त्याचे मिळणारे मोल हे त्यांच्या अर्थकारणाशी निगडीत असते. शेती व शेतकऱ्यांच्या अर्थकारणाला गती देण्याच्या दृष्टीने ही योजना अत्यंत महत्वाची असल्याचे वित्त राज्यमंत्री ड. जयस्वाल यावेळी म्हणाले. ग्रामीण भागात शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांपासून महानगराच्या विस्तारापर्यंत महसूल विभागाला आपली कर्तव्ये पार पाडावी लागतात. यात मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना ही शेतकऱ्यांच्या उज्वल भवितव्याला अधोरेखित करणारी असल्याने या कामातील गुणवत्ता ही त्या त्या भागातील भौगोलिक रचनेनुसार सुनिश्र्चित करणे आवश्यक आहे. यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांनी आपल्या भागात असलेला जमिनीचा पोत व पाणंद रस्त्याची मजबुती कशी गुणवत्तापूर्ण करता येईल याकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. यासाठी गरजेप्रमाणे आवश्यक तेथे योग्य त्या प्रशिक्षणाची व्यवस्था करण्याचे निर्देश अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांनी महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले. त्यांनी दृर

शेती आणि शेतकऱ्यांना जोडणारा दुवा म्हणजे पाणंद रस्ता आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. या योजनेची सखोल माहिती व्हावी, याची अंमलबजावणी करताना अधिकाऱ्यांच्या मनात कोणेतही संदेह राहू नयेत, या योजनेबाबत अकारण पत्रव्यवहार करण्यात वेळ जाऊ नये या दृष्टिकोनातून सारासार विचार करून हे प्रशिक्षण आपण आयोजित केल्याची माहिती विभागीय आयुक्त विजलक्ष्मी बिदरी यांनी दिली.

जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या १४ डिसेंबर २०२५ रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयाची सोपी व सुलभ पद्धतीने माहिती दिली. प्रास्ताविक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी केले. या कार्यशाळेस राज्यातील विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# १५ लाखासाठी पोटच्या गोळ्यासह पत्नीचा अमानुषपणे छळ! ; हुंडाबंदीचा कायदा काय कागदावरच.

केज/प्रतिनिधी-एका विवाहितेला तिच्या माहेराहून वडिलाकडून १५ लाख रुपयांची मागणी करून सतत सासरच्यांनी छळ केल्या प्रकरणी नवऱ्यासह सासू-सासरे दोन नंदा व दीर या सहा जणांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, आयशा शारेफ कुरेशी वय २३ वर्षे रा. बाराभाई गल्ली अंबेजोगाई, ह.मु. कुरेशी मोहल्ला दर्गा रोड केज येथील रहिवाशी असून आयशा कुरेशी यांचे दिनांक १८/१०/२०२१ रोजी शारेफ फिरोज कुरेशी यांच्या बरोबर मुस्लिम धर्मातील रीतीरीवाजा प्रमाणे लग्न झाले होते. सियानाप्रमाणे लग्न हे काजी यांच्या समक्ष झाले होते. लग्नात तीन लाख रुपये हुंडा व सोन्याचे दागिने, संसार उपयोगी वस्तू, मानपान देऊन मोठ्या थाटामाटात आयशा यांच्या आई-वडिलांनी केज येथे एका मंगल कार्यालयामध्ये लग्न लावून दिले होते.

लग्नानंतर आयशा यांना सासरच्या लोकांनी दोन महिने चांगले नांदवले. त्यानंतर त्यांना सासरचे लोक पती शारेफ फेरोज कुरेशी यांनी त्याला काम धंदा नाही. त्यास हार्डवेअरचे दुकान टाकायचे आहे. त्यासाठी तू तुझे आई-वडील यांच्याकडून १५ लाख रुपये घेऊन ये असे म्हणाले असता, आयशा यांनी त्यांच्या वडिलांना फोन करून सांगितले की, तुम्ही माझ्या पतीला हार्डवेअरचे दुकान टाकायचे आहे. त्यासाठी तुम्ही त्यांना १५ लाख रुपये द्या असे आयशा या वडिलांना म्हणल्या असता त्यांचे वडील म्हणाले आत्ताच तुझे लग्न झाले आहे. मी पंधरा लाख रुपये कुठून देऊ असे वडील म्हणाले असता त्यांनी त्यांचे पती शारेफ यांना सांगितले की, माझ्या वडिलांकडे पैसे नाहीत. त्यावर शारेफ यांनी तुझ्या वडिलांनी मला पैसे दिले नाही. तर मी दुसरं लग्न करीन तू तुझ्या वडिलांना तुमचे प्लॉट विकून मला पंधरा लाख रुपये द्यायला सांग असे म्हणाला, त्यानंतर काही दिवसांनी आयशा यांचे वडील हे आंबेजोगाई




येथे त्यांना भेटण्यासाठी गेले होते.आयशा यांनी त्यांच्या वडिलांना सांगितले की, तुम्ही जर माझ्या पतीला पैसे दिले नाही तर माझे पती हे दुसरे लग्न करतो. असे म्हणत आहेत.

त्यावेळी त्यांच्या वडिलांनी पाच लाख रुपये हे आयशा यांचा पती शारेफ यास दिले. त्यावर शारेफ हा पत्नीला म्हणाला की, पाच लाखात मी दुकान कस टाकू आणखी दहा लाख रुपये मागून घे त्यानंतर काही दिवसांनी तारीख आठवत नाही.आयशा यांच्या सासू आरेफा फेरोज कुरेशी यांनी आयशा यांच्या नंदा सुभैया जावेद कुरेशी रा. रेणापूर, रुबीया याकूब कुरेशी रा.नांदेड या दोघींना फोन करून बोलावून घेतले. त्या दोघी आंबेजोगाई येथे घरी आल्यानंतर आयशा यांची सासू व दोन्हीही नंदा यांनी त्यांना म्हणाले की, तुला जेवण बनवता येत नाही असे कारण काढून त्यांनी शिवीगाळ करून आयशा यांना चापटा बुक्क्यांनी मारहाण केली.

दीर फैसल फेरज कुरेशी यांनी आयशा यांना जेवण चांगले बनवले नाही. असे म्हणून जेवण फेकून देऊन शिवीगाळ करून तुझ्या आई-वडिलांनी तुला जेवण बनवायचे शिकवलं नाही का असे म्हणून त्यांच्या हातावर पाय देत होता.

तसेच फेरोज सत्तार कुरेशी सासरा म्हणाला की, तुझ्यासोबत माझ्या मुलाचे लग्न पैशासाठी केले आहे. असे सतत म्हणत होता. व माझ्या पतीला तू हिला सोडून दे असे म्हणत होता. काही दिवसानंतर आयशा यांचे वडील हे मंगळवार बाजार असल्याने त्यांना भेटण्यासाठी आंबेजोगाई येथे गेले असता त्यांनी वडिलांना झालेला प्रकार सांगितला त्यांच्या वडिलांनी केज येथील त्यांचे नातेवाईक, व आयशा यांच्या सासरचे नातेवाईक यांना बोलावून सर्वांना एकत्र बसून सांगितले की, माझ्या मुलीला दिवस गेलेले आहेत. तिला पैशासाठी काही त्रास देऊ नका आम्ही तुम्हाला पाच लाख रुपये दिले आहेत. आता पैसे मागू नका असे सांगितले. त्यावर आयशा यांना काही महिने चांगले नांदवले.

आयशा या डिलेव्हरीसाठी माहेरी गेल्या व त्या डिलेव्हरी झाल्यानंतर सव्वा महिन्यानंतर त्यांना त्यांचे सासरचे सर्व लोक आले होते. त्यावेळेस पण त्यांनी आम्ही परत दुकानात सामान आणायचे आहे दहा लाख रुपये द्या असे म्हणले असता त्यावेळेस त्यांच्या वडिलांनी तीन लाख रुपये दिले. व त्यांना सासरी घेऊन गेले त्यानंतर परत पैशासाठी सतत त्रास देत होते. परंतु त्या त्यांच्या मुलाकडे पाहून त्रास सहन करत होत्या. ऑक्टोंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात तारीख आठवत नाही. आयशा यांना उपाशी पोटी ठेवून त्यांचा सतत शारीरिक व मानसिक छळ करून त्यांना घरातून हाकलून दिले.

आयशा या गेल्या दोन महिन्यापासून त्यांच्या आई-वडिलांकडे माहेरी मुलासोबत राहत आहेत.

दुपारच्या वेळी आयशा ह्या एकटीच घरी असताना त्यांचा नवरा,सासू-सासरा हे यांचे माहेर केज येथे येऊन तुझे वडील पैसे देणार आहेत की,नाही त्यावर आयशा ह्या म्हणाल्या की, पैसे नाहीत देणार असे म्हणल्या असता त्यांनी आयशा यांना शिवीगाळ करून धक्काबुक्की करून तेथून निघून गेले. म्हणून आयशा कुरेशी यांच्या फिर्यादी वरून केज पोलीस ठाणे येथे पती शारेफ फिरोज कुरेशी, सासू आरेफा फेरोज कुरेशी, रा. आंबेजोगाई, ननंद सुमैया जावेद कुरेशी रा.रेणापूर, रुबिया याकूब कुरेशी रा.नांदेड, फैसल फेरोज कुरेशी, फिरोज सत्तार कुरेशी रा.आंबेजोगाई यांच्या विरुद्ध गु.र.नं.७११/२०२५ कलम ८५,११५(२),३५२,३५१(२),३(५) प्रमाणे अधिनियम भारतीय न्याय संहिता (बी एन एस),२०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास हा पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कानिस्टेबल श्रीमती निर्मला जाधव या करत आहेत.

## दयानंद विज्ञानमध्ये आयटी कंपनीत नोकरीसाठी तयारी कशी करावी या विषयावर व्याख्यान

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागाच्या वतीने दि.०१ जानेवारी २०२६ रोजी पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी ' बहुराष्ट्रीय कंपनीत नोकरीसाठी तयारी कशी करावी ' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले होते.याप्रसंगी प्रमुख पाहुणे व साधन व्यक्ती म्हणून बेंगलोर येथील एआयएसआरई डेलॉईटचे पलक चौहान,संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रोहिणी शिंदे, विभाग समन्वयक डॉ. संगीता जाजू,कार्यक्रम समन्वयक प्रा.वैभव कुलकर्णी,प्रा.सुमित जोशी,दीप बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी साधन व्यक्ती पलक चौहान यांनी या सेमिनारचे उद्दिष्ट सांगताना असे म्हणाल्या की,बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये (चछ्छी) यशस्वी रोजगारासाठी पदवीपूर्व आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना उद्योग अपेक्षा,भरती प्रक्रिया आणि आवश्यक व्यावसायिक कौशल्यांबद्दल जागरूकता वाढविणे गरजेचे आहे.अभियोग्यता चाचण्या, तांत्रिक मुलाखती,एचआर फेऱ्या,संवाद कौशल्ये,रिज्युम बिल्डिंग आणि कामाच्या ठिकाणी शिष्टाचार तसेच शैक्षणिक ज्ञान आणि कॉर्पोरेट आवश्यकतांमधील अंतर भरून काढण्यावर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे.विद्यार्थ्यांना जागतिक क्षमता, अनुकूलता आणि आंतरराष्ट्रीय नोकरी बाजारात आत्मविश्र्वासाने स्पर्धा करण्यासाठी आवश्यक असलेली व्यावसायिक मानसिकता विकसित करण्यास प्रेरित करणे हे देखील उद्दिष्ट या सेमिनारमधून साध्य होईल.

प्रास्ताविक व आभार आणि सूत्रसंचालन डॉ.रोहिणी शिंदे यांनी केले.प्रा.वैभव कुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्याचा परिचय करून दिला.याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि बी. एस्सी.सी.एस.द्वितीय,तृतीय आणि बी.एस्सी.ए.आय.व एम.एल.प्रथम वर्षाचे असे एकूण १२९ विद्यार्थी सहभागी झालेले होते.

## मनपा आयुक्तांच्या स्थिर निगराणी पथक व आचारसंहिता कक्षाला भेटी

लातूर /प्रतिनिधी : मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी शहराच्या चारही बाजूंनी स्थापित करण्यात आलेल्या स्थिर निगराणी पथकासह आचारसंहिता कक्षाला भेट देऊन पाहणी केली.



निवडणुकीच्या काळात रोख रक्कम,मद्य तसेच शस्त्रांची वाहतूक होऊ नये म्हणून तपासणी करण्यासाठी विविध ठिकाणी स्थिर निगराणी पथकाची स्थापना करण्यात येते. लातूर मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने औसा रस्त्यावर वासनगाव जवळ,बार्शी रस्ता,अंबाजोगाई रस्त्यावर बोरवटी जवळ, नांदेड रस्त्यावर शेतकी शाळेजवळ तसेच बाभळगाव रस्त्यावर निगराणी पथके कार्यरत आहेत. प्रचाराची सुरुवात होत असल्याने आयुक्त श्रीमती मानसी यांनी अचानक भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली.

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार वाहनांची काटेकोर तपासणी करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळी नोडल अधिकारी तथा नायब तहसीलदार गणेश सरोदे,विस्तार अधिकारी निलेश सोमाणी,झोनल अधिकारी रवी कांबळे, लक्ष्मण जाधव यांची उपस्थिती होती.

गांधी चौक परिसरात स्थापित करण्यात आलेल्या आचारसंहिता कक्षालाही श्रीमती मानसी यांनी भेट दिली. तेथे आचारसंहिता कक्ष प्रमुख तथा उपजिल्हाधिकारी आम्रपाली कसोडेकर, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, विस्तार अधिकारी बालाजी पोतदार, प्रदीप बोंबले, विष्णु शिंदे यांच्यासोबत बैठक घेतली. आचारसंहिता कक्ष, राज्य उत्पादन शुल्क व पोलीस विभागासोबत समन्वय साधून काम करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

## शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र शासन कटीबद्ध - केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान

नाशिक (प्रतिनिधी) :




देशातील सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार भारत सरकारचे कृषी मंत्रालय सोबत सिंचन, पशुपालन असे पूरक विभाग आणि देशातील कृषी विज्ञान केंद्रे कटीबद्ध आहेत. विकसित भारत - जी रामजी' यीजनेतून शेतीला पूरक कामे प्राधान्याने केली जाणार आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय कृषी, शेतकरी कल्याण, ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी येथे केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने आज दुपारी किसान सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. संजीव सोनवणे, प्र - कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्लीचे सहाय्यक महानिदेशक डॉ. राजश्री रॉय बर्मन, कृषि प्राद्योगिकी अनुसंधान संस्थान व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीचे संचालक डॉ. एस. के. रॉय, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे, महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाच्या विस्तार व प्रशिक्षण भागाचे संचालक श्री. रफिक नायकवाडी, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीचे वैज्ञानिक डॉ. शाकीर अली सय्यद, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. नितिन ठोके यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना पुढे केंद्रीय मंत्री श्री. चौहान म्हणाले की प्रत्येक शेतकऱ्यामध्ये आपण देव पाहतो. शेतकऱ्यांची सेवा ही ईश्र्वर सेवा आहे. कारण विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी शेतकरी कष्ट करून जे उत्पादित करतो ते कुठलेही मशीन, ए. आय. किंवा रोबोट उत्पादित करू शकत नाही. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालासाठी प्रक्रिया केंद्रे (प्रोसेसिंग युनिट) साठी मदत केली जाईल. शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र शासनाकडून अनेकविध योजना व उपक्रम राबविण्यात येत आहेत. परंतु दुर्दैवाने काही शेतकऱ्यांना त्यांची पूर्ण माहिती मिळत नाही तर काही योजनांमध्ये मर्यादा असते. शेतकरी मालावरील प्रक्रिया केंद्रे आणि अन्य विषयासंदर्भात आपण राज्यशासनाशी चर्चा करू असे आश्र्वासन त्यांनी दिले. देशातील लहरी हवामान किंवा शेतजमिनीचे कमी क्षेत्रफळ असणाऱ्या देशातील शेतकऱ्यांनी एकात्मिक शेती (इंटेग्रेटेड फार्मिंग) म्हणजे शेतीत फक्त एकच पीक न घेता, पिकांसोबतच पशुपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधमाशीपालन, फळे - फुले आणि भाजीपाला यांसारख्या विविध पूरक व्यवसायांची सांगड घालावी असे आवाहन देखील त्यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी केले. यावेळी नामदार श्री. चौहान यांच्या हस्ते मुक्त विद्यापीठाच्या कृषि विज्ञान केंद्रातर्फे उत्पादित 'यश माइक्रो - न्युट्रीएन्टस ग्रेड - २' या सूक्ष्म अन्नद्रव्य उत्पादनाचे लोकार्पण करण्यात आले.

यानिमित्ताने प्रदर्शित करण्यात आलेल्या महिला स्वयंसहायता बचत गट व शेतीसंदर्भातील स्टॉलला भेट देत महिला व शेतकरी वर्गाशी संवाद साधला. त्यानंतर त्यांच्या हस्ते कृषि विज्ञान केंद्र आवारात बहावा झाडाचे रोपण करण्यात आले. नामदार चौहान यांचे प्रत्यक्ष भाषण सुरु होण्यापूर्वी त्यांच्याशी पेठचे श्री. यशवंत गावंडे (शेतीमाल प्रक्रिया केंद्रे), जानोरीचे श्री. गणेश वाघ (फुलबागा शीतगृह अनुदान), नाशिकचे श्री. रवींद्र अमृतकर (शेतीसाठी यांत्रिकीकारणाचा फायदा), अजमेर सौंदाणेचे श्री. नानाभाऊ पवार (कांदापीक) यांनी आपापल्या विषयानुरूप संवाद साधला. मुक्त विद्यापीठ कृषि विज्ञान केंद्राच्या माजी विद्यार्थिनी व मशरूम उद्योजिका श्रीमती वैशाली उदार यांचा मंत्री श्री. चौहान यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वंदे मातरम गीताने कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी केले. त्यांच्या हस्ते मंत्री श्री. चौहान यांचा स्वागतपर सत्कार करण्यात आला. डॉ. शाम कडूस पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले. कार्यक्रमास शेतकरी, बचतगट महिला व विद्यापीठ कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.